पीएच्. डी. गोषवारा

विषय : तत्त्वज्ञान

संशोधक विद्यार्थ्याचे नाव : श्री. धस नवनाथ उत्तमराव

प्रवर्ग : खुला

ईमेल आय डी : nudhas1122@gmail.com

संपर्क क्रमांक : ९८३४०७५४४७ , ९६८९७४४४८०

संशोधन शीर्षक :

शंकराचार्यांचा वेदांत आणि स्वामी विवेकानंदांचा वेदांत : एक तुलनात्मक अध्ययन

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनील वसंतराव साळुंके

प्राध्यापक व विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

संपर्क क्रमांक : ८४५९८२२९४६

ईमेल आय डी : salunkesv@gmail.com

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्या शाखेअंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील विद्यावाचस्पती

पदवीसाठी सादर केलेला संक्षिप्त गोषवारा

संशोधनाचा विषय

शंकराचार्यांचा वेदांत आणि स्वामी विवेकानंदांचा वेदांत :

एक तुलनात्मक अध्ययन

संशोधक

श्री. धस नवनाथ उत्तमराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनील वसंतराव साळुंके

प्राध्यापक व विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

जुलै, २०२१

शंकराचार्यांचा वेदांत आणि स्वामी विवेकानंदाचा वेदांत :

एक तुलनात्मक अध्ययन

प्रास्ताविक :—

भारतीय तत्त्वज्ञानातील वेदातांचा विचार केल्यास शंकराचार्याचा अव्दैत वेदांत प्रसिध्द आहे व आधुनिक काळातील स्वामी विवेकानंदाचा ‘व्यावहारिक वेदांत’ सुप्रसिध्द आहे. शंकराचार्याचा अव्दैतवाद अध्यात्मिक आदर्शवाद सुचवतो तर विवेकानंदाचा वेदांत दैनंदिन जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करतो.

शंकराचार्यांची दृष्टी ही पारमार्थिक पातळीवरून पाहाण्याची आहे तर स्वामी विवेकानंदांनी व्यवहारिक पातळीवरून पाहिले आहे. म्हणून त्यांनी वैश्विक समस्यांचे समाधान केले आहे. शंकराचार्य आणि विवेकानंदांच्या वेदांतात बरेच साम्य आहे. पण एकाने वेदांताची व्याप्ती तात्त्विक स्वरूपात मांडली आहे. तर एकाने वेदांताला क्रियाशीलतेचे स्वरूप दिले आहे.

उद्दिष्ट्ये :—

समग्र विश्वाकडे पाहिल्यास असे दिसून येते की, प्रत्येक क्षेत्रात व्दैत दिसून येते. मग त्यामध्ये तत्त्व, धर्म, ईश्वर, संप्रदाय आदी असेल यामध्ये विविधता दिसून येते. पण या दोन्ही वेदांत्यांनी व्दैताला अव्दैतात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून खालील उदिष्टये सांगता येतील.

१. विश्वाला अव्दैत्वाच्या धाग्यात बांधण्याचा प्रयत्न करणे.

२. वेदांताला लोकांच्या आकलन कक्षेत आणणे.

३. ब्रम्ह, जीव, आत्मा, ईश्वर संकल्पनेचा अभ्यास करणे.

४. संपूर्ण मानवजातीचे जीवन उन्नत, पवित्र व उदात्त बनवण्यासाठी वेदान्तांची शिकवण देणे.

५. सत्तात्रयी मधील प्रतिभासीक, व्यवहारिक व पारमार्थिक पातळीचा अभ्यास करणे.

६. मायावादाविषयी स्पष्टीकरण पाहाणे.

७. सगुन व निर्गुण ब्रम्हाचे स्पष्टीकरण देणे.

८. अव्दैतातील मोक्ष संकल्पना व मोक्षाची साधने याची माहिती देणे.

९. वेदांतीय आचार्यांच्या सिध्दांताचे स्पष्टीकरण करणे.

१०. शंकराचार्य व विवेकानंदांच्या ईश्वर, धर्म, ब्रम्ह, जगत, जीव आदी संकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

११. वेदांत हा मानवाच्या प्रत्यक्ष ऐहिक जीवनाला सुखकर समृध्द, उन्नत करणारा कसा असू शकतो हे दाखवण्याचा प्रयत्न करणे.

१२. जाती, धर्म, उच, निच, क्षुद्र आदी व्दैत भावाचे रूपांतर अव्दैतात करणे.

संशोधन पध्दती :—

प्रस्तुत संशोधनात अभ्यास करतांना प्रामुख्याने विश्लेषण व तुलनात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल. शंकराचार्य व स्वामी विवेकानंदांनी मांडलेल्या तात्विक संकल्पनेचे विश्लेषण केले जाईल व दोघांच्या संकल्पनेचे तुलनात्मक अध्ययन केले जाईल.

सिध्दांत कल्पना :—

भारतीय वेदांतानुसार प्रत्येकाने एकमेकांशी एकत्वाने जगले पाहिजे अशी अपेक्षा आहे. “अव्दैति दृष्टीने आचरण केल्या मुळे वैश्विक दृष्टीकोण प्राप्त होतो. व

त्यामुळे साऱ्या विश्वात शांतता व समाधान नांदते. अव्दैत वेदांतामुळे जगाकडे पाहण्याची संकुचित वृत्ती समाप्त होऊन व्यापक दृष्टीकोण निर्माण होतो व अध्यात्मिक उन्नती उच्च पातळीवर पोहचते. असे मला वाटते."

संशोधनाची व्याप्ती :—

संशोधनाची व्याप्ती ही शंकराचार्याचा अव्दैत वेदांत व स्वामी विवेकानंदांचा व्यवहारिक वेदांत यांच्यातील तुलनात्मक अध्ययन एवढ्यापुरतीच मर्यादित आहे. क्वचित प्रसंगानुसार इतर भारतीय दर्शनाचा उल्लेख होण्याची शक्यता आहे.

प्रस्तुत संशोधनाची विभागणी ०६ प्रकरणांत करणार आहे.

प्रकरण पहिले :— प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात शंकराचार्य व स्वामी विवेकानंद यांच्या तत्त्वज्ञानाची प्रास्ताविक माहिती सादर करणार आहे. तसेच या अनुषंगाने संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पध्दती, सिध्दांत कल्पना, संशोधनाची व्याप्ती आणि संशोधनावर येणाऱ्या मर्यादा यांचा उल्लेख केला जाईल.

प्रकरण दुसरे :— वेदांत तत्त्वज्ञानाचा परिचय

वेदान्त या शब्दाचे दोन अर्थ करता येतात. अखिल वेदांचा निष्कर्ष सांगणे म्हणून व दूसरा वेदांच्या अंति असणारी जी उपनिषदे, त्यात समाविष्ठ असलेले तत्वज्ञान होय.

उपनिषदे, ब्रम्हसूत्रे व भगवद्—गीता या तीन ग्रंथाना वेदान्ताची प्रस्थानत्रयी म्हणतात. म्हणून निरनिराळया आचार्यांनी प्रस्थानत्रयीवर आपआपली भाष्ये लिहिली. त्यामध्ये शंकराचार्याचा —'केवलाव्दैतवाद;' रामानुजाचार्य — 'विशिष्टाव्दैतवाद' मध्वाचार्याचा — 'व्दैतवाद,' वल्लभाचार्याचा — 'शुध्दाव्दैतवाद' व निंबार्काचार्याचा — 'व्दैताव्दैत वाद' तसेच आधुनिक भारतीय तत्वज्ञानात स्वामी विवेकानंदाचा 'व्यवहारिक वेदान्त' आहेत.

प्रकरण तिसरे :— शंकराचार्याचा अव्दैत वेदान्त

एका जुन्या सुभाषितकाराने अर्ध्या श्लोकात पुरा अव्दैतवेदान्त सांगुन टाकला आहे. तो श्लोकार्थ असा ''ब्रम्ह सत्यं, जगन्मिथ्या, जीवो ब्रम्हैव, नापर:!'' म्हणजेच ब्रम्ह तेवढेच सत्य आहे. जग हे मिथ्या आहे. या जगाविषयीच्या सिध्दांताला मायावाद' म्हणतात. तसेच शंकराचार्याच्या अव्दैतानुसार ब्रम्ह आणि आत्मा यात भेद नाहीत म्हणुन तो जीवच ब्रम्ह आहे. या सर्व गोष्टीचा विचार या प्रकरणात करायचा आहे.

प्रकरण चौथे :— स्वामी विवेकानंदांचा 'व्यावहारिक वेदांत'

स्वामी विवेकानंदांनी आपल्या तत्त्वज्ञानात सर्व वेदांतांच्या विचारसरणीचा समन्वय घातला. स्वामी विवेकानंदांनी वेदांताला 'क्रियाशील वेदांताचे स्वरूप प्राप्त करून दिले. म्हणून त्यांच्या वेदांताला 'व्यावहारिक वेदांत' म्हणतात. स्वामीजीने ब्रम्हाचे अस्तित्व भौतिक, मानसिक, नैतिक सद्‌वस्तूशास्त्रीय अशा सर्व दृष्टीकोणातून आहे असे सांगितले.

जगात आढळणाऱ्या अंतर्विरोधाला विवेकानंदांने माया असे दिले आहे. वस्तुस्थिती ही मायेचे खरे स्वरूप आहे. स्वामीजीनी आत्म्याचे जीवात्मा व विश्वात्मा असे दोन प्रकार केले आहेत या आत्मानूभूतीचे साधन ज्ञानयोग, राजयोग, कर्मयोग, भक्तीयोग हे आहेत. ''धर्म म्हणजे मानवात अधीपासून वसणाऱ्या दिव्यत्वाचा अविष्कार होय'' अशी स्वामीजींनी धर्माची व्याख्या आहे. त्यांनी विश्वधर्माला सर्वेश्रेष्ठ महत्व दिले. इत्यादीचा अभ्यास या प्रकरणात आहे.

प्रकरण पाचवे :— अव्दैत वेदांत व व्यावहारिक वेदांत : तुलनात्मक अध्ययन

शंकराचार्याचा अव्दैत वेदांत अध्यात्मिक आदर्शवादी आहे तर स्वामीजींचा व्यवहारिक वेदांत क्रियाशिलवादी आहे. शंकराचार्य जगाकडे पारमार्थिक सत्तेवरून पाहतात. तर विवेकानंदाने जगाकडे व्यवहारिक सत्तेवरून पाहीले आहे.

जैन, बौध्द, इत्यादी नास्तिक पंथांनी माजविलेला घोटाळा नाहीसा करून श्रुतिस्मृतिविहित सनातन धर्माचे प्रभूत्व पून: प्रस्थापित करण्याचे महत्कार्य शंकराचार्यांनी

केले तर स्वामी विवेकानंदांच्यामते गूढवादाच्या नावाखाली अंधश्रध्दा, भाकडकथा, पौराणिक कथा यांच्या प्रभावाखाली लोकांनी न जगता वैज्ञानिक दृष्टीकोणानुसार जीवन व्यतित करावे.

शंकराचार्यांनी अव्दैत वेदांत मांडला तर विवेकानंदांनी व्यावहारिक वेदांत मांडला आहे. शंकराचार्यांचा वेदांत निवृत्तीप्रवण व तार्किक चर्चेपूरता होता पण स्वामीजींचा वेदांत हा प्रवृत्तिप्रवण व व्यवहार्य होता.

शंकराचार्यांनी ब्रह्म तेवढे सत्य व जगाला त्यांनी पारमार्थिक रिथ्या मिथ्या मानले परंतु स्वामींनी जगाला मिथ्या न मानता जगाला परमेश्वराचे स्वरूप मानले आहे. शंकराची दृष्टी ही एकमेव अव्दैताची आहे पण स्वामींनी अव्दैत, व्दैत आणि विशिष्टाव्दैत, ईश्वर, जीव, जगत, धर्म आदि संकल्पनांचा समन्वय साधला आहे.

अव्दैत वेदान्तानुसार माया ही शक्ती भ्रमाची निर्मिती करते. विवेकानंदांच्या मते ‘माया’ या शब्दाचा अर्थ शुध्द किंवा केवळ भ्रम असा नाही. पण जग हे अनेक अंतर्विरोधांनी व्याघातांनी भरलेले आहे.

प्रकरण सहावे :— निष्कर्ष

प्रस्तुत प्रबंधात अव्दैत वेदांत व व्यावहारिक वेदांत तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर काही ठोस निष्कर्षाप्रत जाण्याची शक्यता आहे. दोन्ही वेदात्यांनी प्रत्येक क्षेत्रात अव्दैताची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. समग्र विश्वाला अव्दैत्वाच्या धाग्यात बांधण्याच्या प्रयत्नामुळे एकात्मतेत भर दिसून येतो.

समग्र विश्वातील जात, धर्म, ईश्वर तत्त्व, संप्रदाय इत्यादींमधील विविधतेत अव्दैताने एका धाग्यात बांधण्यात येवू शकते.

संदर्भ ग्रंथ सूची

१. शंकराचार्य — शारीरिक भाष्य

२. रामानुज — ब्रह्मसूत्र भाष्य

३. ब्रह्मसूत्र शांकर भाष्य —

रत्नप्रभा (भाषानुवादसहित) — अच्युत ग्रंथमाला कार्यालय काशी

४. विष्णू वामन बापट शास्त्री — ब्रह्मसूत्र शांकर भाष्य (मराठी)

५. आचार्य उदयवीर शास्त्री — ब्रह्मसूत्र

६. गंगाप्रसाद उपाध्याय — शांकर — भाष्यलोचन

७. चौखम्बा विद्याभवन वाराणसी — ब्रह्मसूत्र —शांकरभाष्यम्

८. गीताप्रेस, गोरखपूर — उपनिषद अंक

९. प्रा.डॉ. जोशी ग.ना. — भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड ४
शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे
व्दितीय आवृत्ती — २००५

१०. प्रा.डॉ. जोशी ग.ना. — भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड ९
शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे व्दितीय
आवृत्ती — २००५

११. दीक्षित श्रीनिवास — भारतीय तत्त्वज्ञान (फडके प्रकाशन)

१२. डॉ. निगम शोभा — भारतीय दर्शन
(प्रकाशक मोतीलाल बनारसीदास)

१३. स्वामी विवेकानंद — व्यावहारिक वेदांत

१४. प्रा. माधवी कवि — आधुनिक तत्त्वज्ञानातील विचारप्रवाह

१५. स्वामी विवेकानंद — धार्मिक अनुभव

१६. बसन्त कुमार लाल — समकालीन भारतीय दर्शन (मोतीलाल बनारसीदास)

१७. स्वामी अपूर्वानंद — आचार्य शंकर

१८. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी — अव्दितीय कर्मयोगी श्रीआदय शंकराचार्य

१९. रामकृष्ण मठ नागपूर — स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन

२०. प्रा. हरिश्चंद्र त्र्यंबक देसाई — तेजोमत विवेकानंद

२१. डॉ. भरतकुमार तिवारी — विवेकानंद का दार्हाविक चिन्तन

२२. संजयकुमार शुक्ला व सुचेता शुक्ला — दार्शनिक चिंतन के विविध आयाम

२३. उदयवीर शास्त्री — वेदान्त दर्शन का इतिहास

२४. लाल बि. के. — समकालीन भारतीय दर्शन

२५. Radhakrishna — Indian Philosophy – 1, 2

२६. Ganganath Jha — Sankara Vedanta

संशोधक

श्री. धस नवनाथ उत्तमराव

मार्गदर्शक

डॉ. सुनील वसंतराव साळुंके

प्राध्यापक व विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.